# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५
दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स : २२१६३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in
संकेत-स्थळ : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

**प्रकरण क्रमांक ११२/२०१५**

दिनांक : १३ एप्रिल, २०१६

## जाहीर सूचना

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडचा त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठी अर्ज**

१. मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड यांनी त्यांच्या पारेषण परवान्याच्या पुरवठा क्षेत्रातील, तिरोडा आणि अकोला-II उप-केंद्रात प्रत्येकी एक ७६५/४०० केव्ही, १५०० एमव्हीएच्या अतिरिक्त आंतरजोडणी रोहित्रा (आयसीटी)चा समावेश करण्याकरिता आणि तिरोडा उप-केंद्रात एक ७६५ केव्ही बे बसविण्यासाठीची जागा रद्द करण्याकरिता, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत त्यांना मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवान्यात (सन २०१० चा पारेषण परवाना क्र. १) सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराने, अधिनियमाच्या कलम १८(२)(अ) मध्ये आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांच्या अर्जासंबंधी जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी, त्यांच्या अर्जाची सूचना (१) हितवाद (इंग्रजी), (२) देशोन्नती (मराठी), (३) पुण्यनगरी (मराठी) मध्ये दि. ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी आणि (४) लोकमत टाईम्स (इंग्रजी) मध्ये दि. ७ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द केली आहे, परंतु या संबंधात कोणत्याही सूचना/हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

३. राज्य पारेषण कंपनीने त्यांच्या दिनांक २ जून, २०१५ च्या पत्रान्वये, प्रस्तावित पारेषण वाहिन्या समाविष्ट करण्यासाठी, अतिरिक्त आयसीटी बसविण्याची गरज असल्याने, अधिनियमाच्या कलम १८ अंतर्गत, मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड यांना त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

४. आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार, वरील परिच्छेद क्र. १ मध्ये उल्लेख केल्यानुसार, तिरोडा आणि अकोला-II उप-केंद्रात प्रत्येकी एक ७६५/४०० केव्ही, १५०० एमव्हीएच्या अतिरिक्त आंतरजोडणी रोहित्रा (आयसीटी)चा समावेश करण्याकरिता आणि तिरोडा उप-केंद्रात एक ७६५ केव्ही बे बसविण्यासाठीची जागा रद्द करण्याकरिता, मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड यांना मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवाना क्र. २०१० चा १ मध्ये सुधारणा करता येईल.

५. आयोग याद्वारे, मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडच्या पारेषण परवान्यात करावयाच्या सुधारणेस मंजुरीसाठीच्या प्रस्तावावर खालील स्वाक्षरीकर्त्यास दिनांक ५ मे, २०१६ पर्यंत मिळू शकतील अशा रीतीने जनता/हितसंबंधितांकडून सूचना/हरकती मागवीत आहे.

६. कोणत्याही व्यक्तीला मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडच्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in/ www.merc.gov.in या संकेत-स्थळावर किंवा ठरवून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

७. मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड यांनी दाखल केलेल्या अर्जावर सूचना/हरकती दाखल करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने आपले निवेदन इंग्रजी किंवा मराठीत, (५+१) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना व्यक्तिश: किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलद्वारा (फॅक्स : ०२२-२२१६३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in) पाठवावे आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. सूचना /हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ६ मे, २०१६ रोजी ११.०० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५** येथील आयोगाच्या कार्यालयात होणाऱ्या सुनावणीच्या वेळी, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी नोटीस देण्यात येणार नाही.

दिनांक : १३ एप्रिल, २०१६
ठिकाण : मुंबई

सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग